**नगर परिषद मलकापूर जि बुलढाणा**
**प्रशासकीय सभा**
**ठराव क्रं 1 दि 24/2/2022**

**1 नगर परिषद फंडातून त्रयस्थ (Third party) देयके अदा न करण्याबाबत**

नगर परिषद मलकापूर लेखा विभागा मार्फत मा.संचालक,मुंबई यांचे कडून कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांचे वेतनाकरिता दरमहा सहाय्यक अनुदान कमी येत असल्यामुळे सेवानिवृत्त कर्मचारी यांचे सेवानिवृत्ती नंतरचे उपदान रक्कम रु.3907335/- व अर्जीत रजेची रक्कम रु.7614053/- थकीत आहे तसेच कार्यरत कर्मचारी यांचे माहे मार्च 2018ते डिसेंबर 2021 पर्यंत अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे व कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचारी यांचे 7 वा वेतन फरकाची अशी सर्व एकुण रक्कम 69779180/- जवळपास भरणा करणे (देणे बाकी) आहे त्यामुळे नगर परिषद फंडातून त्रयस्थ(Third party) देयके अदा न करता अत्यावश्यक सेवेचे खर्च वगळता इतर रक्कम मधून कर्मचाऱ्यांची देयके प्रदान करणे योग्य राहील अशी टिप्पणी लेखापाल व मुख्याधिकारी यांची प्राप्त झाली आहे.

कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांची मोठया प्रमाणात रक्कम अदा करणे बाकी असल्याने नगर परिषद फंडातून त्रयस्थ(Third party) देयके अदा न करता नगर परिषद फंडातून अत्यावश्यक सेवेचा खर्च वगळता इतर रक्कम मधून कर्मचाऱ्यांची देयके प्रदान करण्यास मंजूरात देण्यात येत आहे.

**(आर.यु सुरडकर)**
**प्रशासक,**
**नगर परिषद,मलकापूर**